## प्रेसनोट दिनांक ०१/०७/२०२३ पोलीस ठाणे :- पिंपरी

## वाहन चोऱ्या करुन चोरीचे वाहने विक्री करुन व्यवसाय करणारी टोळी पिंपरी पोलीसांकडुन गजाआड

दिनांक २७/०६/२०२३ रोजी पिंपरी पोलीस स्टेशन रेकॉर्डवरील पाहिजे आरोपींचा शोध घेणेकामी आम्ही स्वतः तसेच सोबत पोलीस उप निरीक्षक शाकीर जिनेडी, सहा.पोलीस उपनिरीक्षक भांडवलकर, पोलीस हवालदार ६८४ हांडे, पोलीस हवालदार ९७९ बेंदरकर, पोहवा.११८५ बारशिंगे, पोलीस नाईक १७६२ करपे, पो.ना.१७६१ महाडिक, पो.ना.१२२२ बागसिराज, पो.ना.१८८० मुजावर, पोलीस शिपाई २९४८ शेख ,पो.शि.२७२२ जानराव, पोलीस नाईक १९१७ बंड, पो.शि.२६८३ ढोकले, पो.शि.२३५५ वाघमारे, पो.शि.निल ढवळे, पो.शि.बजबळकर असे पिंपरी पोलीस स्टेशन हद्दित दुपारी १४/५० वाजता रवाना झालो होतो. आम्ही रेकॉर्डवरील पाहिजे आरोपी चेक करीत असताना दुपारी १५/२० वाजताचे सुमारास केसएसबी चौकाकडुन पिंपरी मोरवाडी कोर्टाकडे जाणारे रोडवर जुन्या मोरवाडी पिंपरी कोर्टाचे अलीकडे ५० मीटर अंतरावर आलो असताना, दोन मोटार सायकलवर तीन इसम बसुन जात होते, परंतु त्यांचे मोटार सायकलला नंबर प्लेट नसल्याने आम्हाला त्यांचा संशय आला, तेव्हा आम्ही त्यांचा पाठलाग केला असता, त्यांनी पळुन जाण्याचा प्रयत्न करीत अरातानां, आमचेमधील काही गाडया त्यांचे समोर आडव्या लावुन त्यांना जागीच पकडले व त्यांना त्यांची नाव पत्ते विचारले असता, होंडा सीबी शाईन मोटार सायकल वरील इसमाने त्याचे नावे १) आदित्य अनिल देशमुख वय-२३ वर्ष, रा.सुरमापुरी, ता.आंबड, जि.जालना असे सांगितले व हिरो होंडा स्प्लेंन्डरवर बसलेल्या दोघांनी त्यांची नावे २) दादासाहेब ऊर्फ दादया प्रकाश पटेकर वय-१९ वर्ष, रा.मु.आडगांव, पोस्ट-निरी, ता.पाथर्डी, जि.अहमदनगर ३) सुनिल ऊर्फ गोटया सुरेश वाळेकर वय-२५ वर्ष, रा.मु.पिंपळगांव, पो.दौलावडगांव, ता.आष्टी, जि.बीड अशी असल्याचे सांगितलेने, आम्ही त्यांना गाडीचे नंबर प्लेटबाबत विचारून त्यांचेकडे गाडीची कागदपत्रे मागितली असता, सदरचे इसम हे उडवा उडवीची उत्तरे देऊ लागले. तेव्हा आम्ही त्यांचेकडे अधिक सखोल चौकशी करण्या करीता त्यांना पोलीस ठाणे येथे आणले असता त्यांचेमधील दादासाहेबर ऊर्फ दादया प्रकाश पटेकर याने सांगितले की, त्याने व त्याचा मित्र योसेफ खंडागळे रा. बोपखेल, पुणे या दोघांनी मिळुन त्याचेकडे असलेली होंडा सीबी शाईन मोटार सायकल ही डीवाय पाटील मेन गेट जवळून, पिंपरी, पुणे येथुन व हिरो होंडा स्प्लेंन्डर ही लकी स्क्रॅप सेंटर समोर डीवाय पाटील कॉलेज जवळ फुलेनगर भोसरी येथुन चोरी केल्याचे सांगितले व त्यांचे सोबत असलेल्या अदित्य अनिल देशमुख व सुनिल सुरेश वाळेकर यांनी त्या दोन मोटार सायकली विकत घेतल्याचे सांगितलेने, १) दादासाहेब ऊर्फ दादया प्रकाश पटेकर वय-१९ वर्ष, रा.मु.आडगांव, पोस्ट-निरी, ता.पाथर्डी, जि.अहमदनगर, २) योसेफ शमुवेल खंडागळे वय-२२ वर्ष, रा. गणेश नगर कॉलनी नं.५ शुभम अपार्टमेंट, सुदामा जीम समोर बोपखेल पुणे, ३) आकाश प्रकाश पटेकर वय-२३ वर्ष, रा.मु.आडगांव, पोस्ट-निरी, ता.पाथर्डी, जि.अहमदनगर ४) अदित्य अनिल देशमुख वय-२३ वर्ष, रा.चुरमापुरी, ता.आंबड, जि.जालना ५) सुनिल ऊर्फ गोटया सुरेश वाळेकर वय-२५ वर्ष, रा.मु.पिंपळगांव, पो.दौलावडगांव, ता.आष्टी, जि.बीड यांना पिंपरी पोलीस ठाणे गु.र.नं. ६३२/२०२३ भादवि कलम-३७९ मध्ये अटक करण्यात आली आहे.

**दाखल गुन्ह्याचेकामी अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून एकुण ६,६०,०००/- रूपयांचा माल, त्यामध्ये १) एकूण ८०,०००/- रू.किं.ची ०२ दुचाकी वाहने, त्यात यातील ४०,०००/- रू.किं.ची एक होंडा कंपनीची शाईन मोटर सायकल नं. एमएच १४ जीझेड ९७१५. २) एकूण ०३,१०,०००/- रू.किं.ची ०६ दुचाकी वाहने. ३) एकूण ०२,७०,०००/- रू.किं.ची ०६ दुचाकी वाहने काढून दिल्याने सदरची एकुण १४ वाहने ही**

Scanned with CamScanner

निवेदन पंचनाम्याने जप्त करण्यात आलेली आहेत. तरोच सदर आरोपींकडून खालीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

| अ.क्रं. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि. क्रं. | कलम |
|---|---|---|---|
| १ | पिंपरी | ६३२/२०२३ | भादंवि कलम ३७९ |
| २ | पिंपरी | ६६८/२०२३ | भादंवि कलम ३७९ |
| ३ | भोसरी | ५०८/२०२३ | भादंवि कलम ३७९ |
| ४ | दिघी | २६०/२०२३ | भादंवि कलम ३७९ |
| ५ | खडकी | १४५/२०२३ | भादंवि कलम ३७९ |
| ६ | खडकी | १६८/२०२३ | भादंवि कलम ३७९ |
| ७ | विमानतळ | ३०७/२०२३ | भादंवि कलम ३७९ |
| ८ | विश्रांतवाडी | १२९/२०२३ | भादंवि कलम ३७९ |
| ९ | पुणे रेल्वे | २६६/२०२३ | भादंवि कलम ३७९ |
| १० | शिक्रापुर | ८६४/२०२२ | भादंवि कलम ३७९ |

सदरची कामगिरी मा.श्री. विनयकुमार चौबे, पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड, मा. श्री. डॉ. संजय शिंदे, पोलीस सह आयुक्त सो, पिंपरी चिंचवड, मा.श्री. वसंत परदेशी अपर, पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड, मा.श्री. विवेक पाटील, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ- १, पिंपरी चिंचवड, मा. श्री. सतीश कसबे, सहायक पोलीस आयुक्त सो, पिंपरी विभाग, पिंपरी चिंचवड, श्री. राम राजमाने, वरिष्ठ पोलीस निरिक्षक व श्रीमती रूपाली बोबडे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पिंपरी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक श्री. अनिरूध्द सावर्डे, शाकिर जिनेडी, सपोफौ प्रमोद भांडवलकर, पो.हवा. राजेद्र बारशिंगे, पो.हवा. शांताराम हांडे, वसंत बेंदरकर, पो.ना. जावेद बागसिराज, गणेश करपे, सोमेश्वर महाडीक, विष्णू भारती, ओंकार बंड, जावेद मुजावर, मपोना भाग्यश्री जमदाडे, पो.शि. मोहसिन शेख, विजय जानराव, रोहित वाघमारे, विकास रेड्डी, समीर ढवळे, आनंद बजबळकर, सुरज ढोकले व दत्ताजी कवठेकर यांनी केली आहे.

( राम राजमाने )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
पिंपरी पोलीस ठाणे, पिं.चिं.

Scanned with CamScanner